**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार दिनांक १७ नोव्हेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. **भाजपने देशात फूट पाडण्याचं काम केलं असल्याची काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांची नागपुरातील जाहीर सभेत टीका, तर महाराष्ट्राने कट्टरतेचं राजकारण नाकारलं असल्याचं प्रियांका गांधी यांचं गडचिरोलीत प्रतिपादन.**
2. **महायुती सरकारने राज्यात केलेल्या विकास कामांमुळं राज्यातला मतदार महायुतीच्या बाजूने उभा राहील; भाजप नेते केंद्रीय मंत्री शिवराज सिंग चौहान यांनी नागपुरातील पत्रकार परिषदेत व्यक्त केला विश्वास.**
3. **प्रचारांच्या तोफा उद्या सायंकाळी थंडावणार; नागपुरात आज स्टार प्रचारकांच्या रॅलींना गर्दी.**
4. **विदर्भात थंडीच्या तीव्रतेत किंचित वाढ; किमान तापमानात घसरण.**

**-------------------------------------**

**मल्लिकार्जुन खरगे-उमरेड सभा**

**देशासाठी जीवनदान दिलेल्या सर्व महान नेत्यांना विभागण्याच काम भाजप करत आहे. समाजाला आधीच यांच्या विचारांनी विभागून ठेवलं आहे. विभागा आणि राज्य करा अशी यांची राजनीती आहे. पंडित जवाहरलाल नेहरू आणि बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या नेत्यांनी लोकशाहीच्या रक्षणासाठी आपलं आयुष्य वेचलं. पण, भारतीय जनता पार्टीने मात्र देशात फूट पाडण्याचं काम केलं अशी टीका काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी आज केली. नागपूरजवळ उमरेड इथे प्रचारसभेत ते बोलत होते. महायुती सरकारने शेतकरी, स्त्रिया आणि तरुणानं साठी काहीही केलं नाही राज्यात आता मतदारांना सरकार बदलायचं आहे आणि हे खोटं सरकार पाडायचं आहे, असं आवाहन त्यांनी उपस्थितांना केलं.-**

***जिथं मन असते तिथं सगळं काही होते. पण तुम्ही करणार नाही हे साबित आहे, तुम्हाला सत्ता देऊन बघितलं आहे, आता आम्हाला एकदा संपूर्ण बहुमत द्या. मला आमच्या आईंना, बहिणींना मी तुम्हाला विनंती करतो, तुम्ही फार विचार करून हे मतदान करावं.***

दरम्यान, महाविकास आघाडीच्या प्रचार समारोपाची जाहीर सभा आज मुंब इथे होणार आहे. या सभेसाठी ज्येष्ठ नेते शरद पवार, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यासह सर्व प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत.

---------------------------------------

प्रियांका गांधी सभा

जातनिहाय जनगणना आणि आरक्षणाची मर्यादा 50 टक्क्यांपेक्षा अधिक करण्यास पंतप्रधान नरेंद्र मोदी का घाबरतात, असा सवाल काँग्रेसच्या नेत्या प्रियंका गांधी यांनी आज गडचिरोली जिल्हयतील देसागंज येथील सभेत केला. प्रियंका गांधी यांनी महाविकास आघाडीचे आरमोरी विधानसभा क्षेत्राचे उमेदवार रामदास मसराम आणि गडचिरोली विधानसभा क्षेत्राचे उमेदवार मनोहर पोरेटी यांच्या प्रचारार्थ आयोजित जाहीर सभेला संबोधित केलं. महायुतीच्या काळात महाराष्ट्रात येऊ घातलेले उद्योग गुजरातमध्ये नेण्यात आले, यामुळे राज्यातली दहा लाख कोटींची गुंतवणूक बाहेर गेली, आठ लाख नोकऱ्या गेल्या, आणि ६ हजारपेक्षा जास्त कंपन्या बंद पडल्या, असा आरोप गांधी यांनी केला. स्वातंत्र्यानंतर देशभरात मोठमोठे उद्योग, संस्था, निर्माण झाल्या. कोणत्याही सरकारने जनतेसोबत भेदभाव केला नाही. मात्र महायुती आणि भाजपचं सरकार जनतेसोबत भेदभाव करतं, अशी टीका गांधी यांनी केली. कट्टरतेला विरोध करत समानता आणि एकोप्याने राहणारा महाराष्ट्रातील समाज आहे असं गांधी यावेळी म्हणाल्या

*तो ये आपकी की धरती है, इसने मार्गदर्शन दिया है पुरे देश को हमेशा, नींव डाली है देश के संविधान की, धार्मिक कट्टरता के विरोध विचारधारा की धरती है, समानता, एकजुटता यही से उभरी है । की यहाँ के संतो ने हमेशा एकजुटता की बात की और हमारे देश की राजनीती है वो भी उसी एकजुटता पर ही बनी है ।*

या सभेला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांच्यासह काँग्रेसचे अनेक नेते उपस्थित होते. गडचिरोलीतील सभेनंतर प्रियांका गांधी यांनी काँग्रेसचे पश्चिम नागपूरचे उमेदवार विकास ठाकरे आणि मध्य नागपूरचे उमेदवार बंटी शेळके यांच्या प्रचारार्थ नागपुरात रोड-शो केला.

---------------------------------------

शिवराज सिंग चौहान

केंद्रीय मंत्री शिवराज सिंग चौहान यांनी आज नागपूर इथं पत्रकार परिषद घेतली. राज्यातल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीचा महाविजय होल, असा विश्वास केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंग चौहान यांनी यावेळी व्यक्त केला. केंद्र सरकारच्या मार्गदर्शनाखाली महायुती सरकारने राज्यात जी विकासकामं केली आहेत, त्यामुळे

राज्यातला मतदार नक्कीच महायुतीच्या बाजूने उभा राहील, असा विश्वासही चौहान यांनी यावेळी व्यक्त केला.

-------------------------------------

आजच्या इतर सभा नागपूर/विदर्भ

विधानसभा निवडणुकीसाठी येत्या बुधवारी २० नोव्हेंबरला मतदान होत आहे. आज शेवटचा रविवार असल्याने सर्व पक्षांकडून जोमाने प्रचार केला जात आहे. या निवडणुकीत एकूण ४ हजार १३६ उमेदवारांचं भवितव्य ठरणार आहे. यावेळी निवडणूक रिंगणात ३६३ महिला उमेदवार आहेत.

-------------------------------------

देवेंद्र फडणवीस

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपूर दक्षिण पश्चिम मतदारसंघात रोड शो केला. महायुतीबद्दल सर्वसामान्य जनतेच्या मनात आदर, आपुलकी आणि विश्वास आहे, याचा प्रत्यय या रॅलीच्यानिमित्ताने प्रत्यक्ष अनुभवता आला, असं फडणवीस म्हणाले.

-------------------------------------

कंगना रणौत

भारतीय जनता पक्षाच्या खासदार आणि अभिनेत्री कंगना रणौत यांनी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात भाग घेतला आहे. मध्य नागपूर मधील भाजपाचे उमेदवार प्रविण दटके यांचा प्रचारार्थ रॅलीमध्ये त्या सामील झाल्या. मध्य नागपूर मधून रॅलीची सुरुवात होऊन रॅलीचा समारोप गोलीबार चौक इथं झाला. या रॅलीत भारतीय जनता युवा मोर्चा नागपूरच्या अध्यक्ष शिवानी दाणी, यांसह भाजपचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

-------------------------------------

प्रफुल पटेल

गोंदिया भंडारा जिल्यात महायुती लढत असलेल्या सातही जागा निवडून येतील सा विश्वास अजित पवार राष्ट्रवादी गटाचे नेते खासदर प्रफुल पटेल यांनी व्यक्त केला. ते आज गोंदिया विधानसभा क्षेत्राचे महायुतीचे उमेदवार विनोद अग्रवाल यांच्या प्रचार सभेत बोलत होते. विकासाच्या मुद्यावर आम्ही भाजप सोबत गेलो असही ते यावेळी म्हणाले.

-------------------------------------

रविकांत तुपकर

वर्धा जिल्ह्यातील मोठी आंजी आणि अल्लीपुर इथं शेतकरी नेते रविकांत तुपकर यांची जाहीर सभा पार पडली. ही निवडणूक शेतकरी प्रश्नांवर होत असून शेतकऱ्यांसोबत कायम उभं राहणाऱ्या उमेदवारांना मतदान करण्याचं त्यांनी आवाहन केलं.

-----------------------------------------

भजन लाल शर्मा

राजस्थानचे मुख्यमंत्री भाजप नेते भजन लाल शर्मा हे आज सायंकाळी ८ वाजता नागपूर पश्चिम मध्ये जाहीर सभा घेणार आहेत.

-----------------------------------------

नितीन गडकरी

उद्या दिनांक १८ नोव्हेम्बर रोजी सायंकाळी ५ वाजता प्रचार थांबणार आहे. अखेरच्या दिवशी भाजपचे नितीन गडकरी यांच्या चार सभा होणार आहेत. यातील दोन सभा गोंदियातील सडक अर्जुनी आणि तिरोडा इथं तर प्रत्येकी एक सभा आणि कामठीत आणि मध्य नागपुरातील गोळीबार चौकात होणार आहेत.

-----------------------------------------

चित्रपट महोत्सव

येत्या २० ते २८ नोव्हेंबर दरम्यान गोवा इथं होणाऱ्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात आंतरराष्ट्रीय निवड समितीच्या अध्यक्षपदी चित्रपट निर्माते आणि दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर यांची निवड करण्यात आली आहे. "जोधा अकबर", "लगान" आणि "स्वदेश यांसारख्या चित्रपटांची निर्मिती गोवारीकर यांनी केली आहे. या निवडीबद्दल गोवारीकर यांनी आनंद व्यक्त केला असून जगभरातील प्रयोगशील आणि उत्तम चित्रपट पाहण्यासाठी हा महोत्सव, महत्वाचं व्यासपीठ असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

-----------------------------------------

मतदान जनजागृती

नागपूर शहरातील मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी नागपूर महानगरपालिका आणि जिल्हा प्रशासनाद्वारे विविध जनजागृती अभियान राबविण्यात येत आहेत. या अभियानाला शहरातील व्यापारी बांधवांनी सहकार्य दर्शवित मतदान जनजागृतीसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन केले आहे. मध्य आणि पूर्व नागपूर भागामध्ये कार्यरत व्यापारी असोसिएशनने यासाठी पुढाकार घेतला असून सोमवारी १८ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत गांधीबाग येथील जैन मंदिर इथं १०० टक्के मतदानासाठी आरोग्य शिबिराचं आयोजन करण्यात आलं आहे.दरम्यान, 'नागपूरकर

वोट कर..'असा संदेश देत नागपूर महानगरपालिका आणि जिल्हा प्रशासनाच्या कर्मचाऱ्यांनी आज 'बा□क रॅली'मधून नागपूर शहरातील जनतेला मतदानाचा संदेश दिला. या रॅलीमध्ये सहभागी होऊन पोलीस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल, निवडणूक निरीक्षक सुनीलकुमार सिंग, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांनी सहभागींचा उत्साह वाढविला. नागपूरकरांच्या मतदानाच्या निर्धारामुळे यावेळी ७५ टक्के मतदानाचे लक्ष्य नक्की प्राप्त होणार, असा विश्वास पोलीस आयुक्त सिंगल यांनी व्यक्त केला.

-----------------------------------------

मतदान प्रचार बंदी

सार्वत्रिक विधानसभा निवडणूक-2024 साठी बुधवार दिनांक २० नोव्हेम्बर रोजी मतदान होणार आहे. सर्व जिल्ह्यातील सार्वजनिक शांतता आणि सुव्यवस्था अबाधित राहणे आवश्यक असल्याने तसेच विधानसभा सार्वत्रिक निवडणूक निर्भय आणि निपक्षपातीपणे पार पाडण्याच्या दृष्टीने प्रशासनाच्या वतीनं काही निर्बंध जारी करण्यात आले आहेत.

-----------------------------------------

हवामान

विदर्भात सर्वत्र थंडीचे आगमन झालेलं आहे. दिवसेंदिवस थंडीची तीव्रता हळूहळू वाढत आहे. नागपुरात मागील 24 तासात किमान तापमान 14 पूर्णांक आठ दशांश अंश इतकं खाली घसरलं होतं. तर गडचिरोली आणि गोंदिया इथं १४ पूर्णांक ६ दशांश अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली. अमरावतीमध्ये 14.9, यवतमाळात 16.1, वर्ध्यात 16.1, अकोल्यात 17 तर बुलढाण्यात 16.6 दशांश अंश सेल्सियस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली. दरम्यान मागील 24 तासात कमाल तापमान वाशिम इथं 34.4 दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं. तर नागपूरला कमाल तापमान 31.6°c इतकं होतं.

-----------------------------------------